International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.5 May – June 2023

# भाजप — शिवसेना — धार्मिकतेतुन सत्तेकडे

**प्रा. निकम अधिकराव हिंदूराव**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख*
*श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव, कोल्हापूर*
*Corresponding Author - प्रा. निकम अधिकराव हिंदूराव*
DOI - 10.5281/zenodo.14684879

**प्रस्तावना —**

भारतीय जनसंघ हाच नंतर भारतीय जनता पक्ष हिंदुत्ववादी राजकीय पक्ष म्हणून उदयाला आला. भारतीय जनसंघाचा उदय होण्यापूर्वी महाराष्ट्रात हिंदु महासभा, रामराज्य परिषद यासारखे राजकीय पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यासारख्या संघटना हिंदुत्ववादाचा पुरस्कार करित होत्या. पंडीत मदनमोहन मालवीय आणि लाला लजपतराय यांनी १९१५ साली आखिल भारतीय हिंदू महासभेची स्थापना केली. १९३७ सालानंतर हिंदू महासभेच्या नेतृत्वाची सूत्रे स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी घेतली आणि महासभेचा कॉंग्रेस विरोध अधिक तीव्र बनला. त्यानंतरच्या काळामध्ये या पक्षाचे नेतृत्व ब्राह्मणी असल्याने या पक्षाची 'ब्राह्मणी' म्हणजेच बहुजन समाज विरोधी अशी प्रतिमा निर्माण झाली. याचाच परिणाम म्हणजे १९८९ पर्यंत महाराष्ट्रामध्ये हिंदुत्वादी विचारसरणीचा फारसा शिरकाव झाला नाही. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या दारूण पराभवाचे विश्लेषण केल्यानंतर राश्ट्रीय स्तरावरील पक्षनेत्यांनी 'गांधीवादी समाजवादाचा त्याग करून उघड—उघड हिंदुत्वाची भूमिका स्वीकारण्याचा आणि त्याकरिता आक्रमण व्यूहरचना करण्याचा निर्णय घेतला. त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रात १९८९ साली 'भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची युती झाली' १९८५ च्या नंतरच्या कालखंडात या पक्षाने विविध जाती—जमातीत विखुरलेल्या हिंदूचे संघटन करण्याचा कार्यक्रम हाती घेतला.

भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांनी नेहमीच हिंदुत्ववादी विचारसरणीचा पुरस्कार केला त्यांच्यामते ''हिंदु समाजाचा सांस्कृतिक वारसा गौरवशाली आहे आणि त्याची फेरस्थापना करण्यासाठी हिंदुराश्ट्राची निर्मिती अपरिहार्य आहे. अल्पसंख्यांकापुढे राज्यकर्त्यांनी गुडघे टेकणे किंवा त्यांना अवाजवी सवलत देणे अल्पसंख्य

आयोग, अल्पसंख्या करिता विशेष तरतूदी व सवलत राज्यघटनेत जम्मू आणि काश्मिर राज्याला विशेष दर्जा देणारे कलम ३७० त्यांना अमान्य आहे. पाकव्याप्र काश्मीरची मुक्तता करण्याबाबत आणि पाकिस्तानच्या आक्रमक हालचालींना ''मुहतोड जबाब'' देण्याबाब हा पक्ष आग्रही आहे. हिंदु धर्मीयांची श्रध्दास्थाने असलेल्या रामजन्मभूमी, कृष्णजन्मभूमी, काष्शीविष्वेष्वर आणि अन्य धार्मिक स्थळांबाबत हा पक्ष विषेश आग्रही आहे. गेल्या काही वर्शात हिंदुत्वादी लाट निर्माण करण्यात हा पक्ष यशस्वी ठरला आहे. आणि त्याचा काही प्रमाणात फायदा या पक्षाला महाराष्ट्रात मिळाला आहे''. म्हणजेच या पक्षाची विचारसरणी संप्रदायवादी आहे. राश्ट्रीय स्तरावर भारतीय जनता पक्षाने तर महाराष्ट्रामध्ये शिवसेना या प्रादेशिक पक्षामध्ये हिंदुत्वाच्या मुद्दयावर एकमत होऊन या दोन्ही पक्षांची आघाडी झाली आहे. शिवसेना प्रादेशिक अस्मितेबाबत आग्रही असणारा पक्ष आहे. मराठी माणसांचे हितसंबंध जोपसणारी एक चळवळ म्हणून हा पक्ष उदयाला आला असला तरी हिंदुत्वादी जोपासणा करणारा पक्ष अशी ही नंतरच्या काळामध्ये ओळख निर्माण झाली.

शिवसेना स्थापनेमध्ये कडव्या हिंदुत्वाचा पुरस्कार करणे हा महत्वाचा उद्देश आहे. बाळासाहेब ठाकरे यांची भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्वाच्या तत्वाशी दिसुन येते. शिवसेना ही हिंदुत्वावर कडवी निष्ठा असलेली व मुस्लिम विरोधक म्हणून प्रसिध्द आहे. 'गर्व से कहो, हम हिंदू है', ही शिवसेनेची घोषणा शिवसेनेचे कट्टर हिंदुत्वनिष्ठ धोरण दर्शविते. सेनेच्या दृष्टीने साम्यवादाप्रमाणेच मुस्लिमाच्या निष्ठा या हिरवा झेंडा व पाकिस्तानशी आहेत म्हणून ते अराष्ट्रीय आहेत. ठाकरे यांच्या मते हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व अन्य बिगर हिंदू अल्पसंख्याक हे अराष्ट्रीय आहेत. या देशाची प्रभुत्व संपन्न संस्कृती ही हिंदू संस्कृती आहे अन्य धर्मीयांनी तिचा बिनतक्रार स्वीकार केला पाहिजे. १९९२ मध्ये झालेल्या आयोध्येतील बाबरी मस्जिद प्रकरणामध्येही हिंदुत्ववादी षक्तीचे प्रदर्शन झाले. डिंसेबर १९९२ व जानेवारी १९९३ मध्ये मुंबईत झालेल्या दंगलीमध्ये ही संप्रदायवादी प्रवृत्ती प्रकाश झोतात आली. शिवसेनेत नवे चैतन्य निर्माण व्हावे म्हणून बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या विचारसारणीला प्राधान्य देवून नंतरच्या काळात कार्य करण्यास प्रारंभ केला त्यामुळे शिवसेना मुंबई बाहेरही खेडयापाडयात पोहचली. शिवसेनेत मुस्लिमाच्या विरोधात हिंदुत्वाचा व हिंदुराश्ट्राचा पुरस्कार

केंल्यामुळे काही अभ्यासक शिवसेनेला हिंदुत्ववादी पक्ष ठरवून तिच्यावर भाष्य करताना वेगळयाप्रकारच्या भूमिका मांडताना दिसतात. भडक भाशणातून राश्ट्रवादीची भूमिका घेणा—या शिवसेनेला केवळ लोकांचे मनोरजंन करणारा पक्ष म्हणून चालणार नाही. सुहास पळसीकराचे मत आहे की, राश्ट्राची संकुचित कल्पना, अत्यतिक कडवा राष्ट्रवाद, साम्यवादाला विरोध बाहेरच्याना विरोध लोकशाही ऐवजी हुकुमष्शाहीचे समर्थन सर्व राजकीय पक्ष व पक्षीय राजकरणाची टवाळी, दयाळू हूकूमशाहीचे गुणगाण, हिंसेचे गर्वीकरण कायदा व कायदेशिर कार्यपध्दतीबद्दल नापसंती, कायदा हाती घेण्याची समर्थन, शत्रू प्रतिमाची निर्मिती, कोणत्याही गोष्टीचे अतिसूलभिकरण व विडंबन आणि बौध्दिकता विरोधी या शिवसेनेच्या सर्व वैशिष्टाचे वर्णन वाग्मी, लाकानुरजनी , जमातवादी यापैकी कोणत्याही एका विषेशणातून होत नाही त्यामुळे त्या सर्वाच्या पलिकडे जाऊन शिवसेनेचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. 'निम—फॅसिस्ट' राजकीय संघटना असे शिवसेनेचे वर्णन पळशीकरांनी केले आहे.'' एकुणच महाराष्ट्रातील सरकारचा अभ्यास करताना असे दिसून येते की हिंदुत्ववादी षक्तीमध्ये झालेल्या वाढीचा याच्याशी जवळचा संबंध आहे. ज्यावेळी दोन घटकपक्ष एका मुद्दावर एकत्र येतात त्याचबरोबर ज्यावेळी दोन पक्षामध्ये तांत्रिक एकरूपता असते त्यावेळीच ते दोन्ही पक्ष एकमेकाशी आघाडी करतात कॉंग्रेस हा भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये एकमेव प्रबळ पक्ष म्हणून आस्तित्वात होता परंतू हिंदुत्वाच्या मुद्दयावर भारतीय जनता पार्टी व महाराष्ट्रामध्ये शिवसेना यांनी ज्या पध्दतीने राजकारणामध्ये प्रवेश केला त्यावरून असे दिसून येते की हिंदुत्वामुळे एक प्रबळ विरोधी पक्ष एक षक्ती उदयाला आली. आज देषामध्ये संपूर्ण राजकारण हे हिंदूत्वाच्या एका मुद्दावर फिरत असलेले दिसून येते हिंदूची मोठी संख्या असलेल्या या देशामध्ये या मुद्दयावर राजकारण करणे हे अतिषय जोखमीचे असले तरी भाजपासारख्या पक्षाणी पूर्ण कौषल्याने त्या मध्ये यष मिळवले आहे. महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पक्षाच्या विचारप्रणालीशी अनुरूप बाळासाहेब ठाकरे याचे विचार जुळले व त्यातुनच पुढे हिंदूत्वावर निष्ठा ठेवणारा प्रचंड मोठा वर्ग निर्माण झाला ज्या भोवती आज महाराश्ट्राचे राजकारण फिरत आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये कॉंग्रेस व राश्ट्रवादी कॉंग्रेस हया आघाडीच्या विरोधात भारतीय जनता पक्ष व शिवसेना पारंपारिक विरोधी पक्ष

म्हणून निवडणूक लढविते. पक्षाच्या स्थापनेपासूनच या दोन पक्षामध्ये वैचारिक एकरूपता असल्यामुळे हे दोन्ही पक्ष महाराश्ट्राच्या राजकारणामध्ये एकत्र आले. भारतीय जनता पक्ष महाराश्ट्रात मध्यम वर्गीय व नागरी पक्ष मांडला जाई. बाळासाहेब ठाकरे यानी यांनी हिंदुत्वादाला पांठिबा दिल्यानंतर १९८० च्या दरम्यान भारतीय जनता पक्ष अशी शिवसेना हे दोन पक्ष अधिक जवळ आले शिवसेना आणि भारतीय जनात पक्ष यांच्या युती होण्यासाठी लागणारे समान मुद्दे या दोन्ही पक्षात आढळतात समान नागरी, कायदा ३७० कलम काढून टाकणे बांग्लादेशी घुसखोराची हकलपट्टी करणे, राम–मंदिर उभारणे इत्यादी मुद्दे दोन्ही पक्षात समान आहेत. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना भाजप बरोबर युती करूण ५२ जागा जिंकल्या होत्या तर भाजपाला ४२ जागा मिळाल्या होत्या. या ४२ जागापैकी अनेक जागा ग्रामीण भागातल्या होत्या पक्षाचे नेतृत्व देखिल नागरी मध्यवर्गीय राहिले नाही तर ग्रामीण भागातील सुरक्षित मागासवर्गीयाकडे गेले त्यामळे भारतीय जनता पक्षाची पर्वीची प्रतिमा बदलून त्याला व्यापक सामाजिक अधिकार प्राप्त झाला १९९५ च्या निवडणुकीत शिवसेनेने ७३ तर भारतीय जनता पक्षाने ६५ जागा जिंकून अपक्षाच्या सहाय्याने सत्ता मिळवली. यामुळे युतीचे महाराश्ट्रातील स्थान अधिक बळकट झाले. शिवसेना — भाजपा युतीचे सरकार राज्यात येताच सरकारने धडावयाने महत्वाचे निर्णय घेण्यास सुरूवात केली गोरगरीबासाठी वेगवेगळया अनेक योजना राबवून महाराश्ट्रामध्ये चांगली प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रात युती सरकारणे १९९५ ते १९९९ असे साडेचार वर्ष सरकार चालवले. मात्र १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत युतीला पराभव पत्करावा लागला. २०१४ च्या विधानसभा निवडणुकित शिवसेना—भाजपाणे परत महाराष्ट्रातील सत्त प्राप्त केली व ख—या आर्थाने काँग्रेस—राष्ट्रवादी काँग्रेसला शह देवून एक प्रबल स्थिर शासन देले. आज महाराष्ट्रात काँग्रेस, काँग्रेस यांना पर्यायी पक्ष म्हणून शिवसेना, भाजप यांचा उदय झालेला दिसून येतो.

**संदर्भ —**

१) भारतातील राज्यांचे राजकारण — प्रा.डॉ.मोहन दिवाण, विद्या प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती — २००४ पृ. १४६—१४७

२) महाराष्ट्र शासन — प्रा. बी. बी पाटील फडके प्रकाशन प्र. आ. २०११ पृ ४७

३) महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण डॉ. षोभा कारेकर, डॉ. षरद घोडके, अंशुल पब्लिकेशन्स नागपूर प्र. आ. २००४ पृ. १५८

४) महाराष्ट्र शासन आणि राजकारण — डॉ. अशोक जैन — षेटे पब्लिषर्स मुंबई — सन १९९८ प्र. आवृत्ती — पृष्ठ १०७

५) महाराष्ट्राचे शासन आणि राजकार — डॉ शोभा कारेकर, डॉ. षरद घोडके — अंशुक पब्लीकेशन नागपूर — प्र. आ. २००४ पृ. १६९

६) तत्रैव पृ. १७१

७) आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण — व म. सिरसीकर, कॉन्टिन्हल प्रकाशन विजय नगर पुणे ३० प्र. आ.२००१, वि, आ. २००८ — पृ. २४७

८) भारताचे शासन आणि राजकरण — डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे — चौथी आवृत्ती — २०१० — पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिषर्स नागपूर पृ. २०९

९) महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण — डॉ एकनाथ खांदवे — आरती प्रकाशन कर्जत, प्रथम आ. २००९ पृ. १९३